**—: प्रेस नोट :—** दिनांक : ०४/०२/२०१९

यातील फिर्यादी यांचेकडे ट्रेड लायसन्स नसल्याचे सांगून कारवाई न करण्यासाठी रुपये १५,०००/— रकमेची लाच स्विकारल्याने मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०९/२०१९ |
| कलम | कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ (सुधारीत अधिनियम २०१८) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) महेंद्र चंद्रकांत शिर्के, वय ५५ वर्षे, पद — वरिष्ठ अनुज्ञापन निरीक्षक<br>२) मिलिंद यशवंत कीर, वय ५० वर्षे, पद — अनुज्ञापन निरीक्षक,<br>दोन्ही आलोसे नेमणुक अनुज्ञापन कार्यालय, बृहन्मुंबई महानगर पालिका, एल वॉर्ड, कुर्ला (पश्चिम) मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २०,०००/— |
| तडजोडीअंती स्विकारलेली रक्कम | रु. १५,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी हे कपडा धुलाई व कलरचा व्यवसाय करतात. दिनांक ०२/०२/२०१९ रोजी अनुज्ञापन कार्यालय, बृहन्मुंबई महानगर पालिका, एल वॉर्ड येथील वरील नमुद दोनही आलोसे हे फिर्यादी यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी आले व त्यांनी फिर्यादी यांचेकडे ट्रेड लायसन्स नसल्याचे सांगून कारवाई न करण्यासाठी रुपये २०,०००/— रकमेच्या लाचेची मागणी केली व दिनांक ०४/०२/२०१९ रोजी सदर लाचेची रक्कम तयार ठेवण्यास सांगितले.<br><br>फिर्यादी यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयात दिलेल्या तक्रारीवरुन पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान यातील आलोसे क्र. २ याने फिर्यादी यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी जावून तडजोडीअंती रुपये १५,०००/— स्विकारण्याचे कबुल केले व आलोसे क्र. १ हे तेथे लागलीच येत असुन पैसे घेवून येण्यास सांगितले. काही वेळातच आलोसे क्र. १ हे सदर ठिकाणी आले. त्या दोघांनी फिर्यादीचा गाळा असलेल्या कंपाऊंडमध्ये उभ्या असलेल्या आलोसे क्र. २ यांच्या मालकीच्या कारमध्ये फिर्यादीसह बसुन आलोसे क्र. १ याने लाचेच्या रक्कमेबाबत फिर्यादीशी चर्चा केली व आलोसे क्र. २ याने रु. १५,०००/— रोख रकमेची लाच स्विकारली असता दोनही आलोसेना रंगेहात पकडण्यात आले. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

**संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.**
**संकेतस्थळ — acbmaharashtra.gov.in**
**ईमेल : (1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन - www.acbmaharashtra.net**
**टोल फ्री क्र. १०६४**
**दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,**
**व्हॉट्स ॲप क्रमांक —९९३०९९७७००**

सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

( एम. एन. मुगुटराव )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
अपर पोलीस उप आयुक्त (अतिरिक्त कार्यभार)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग.

Scanned by CamScanner